।। बहुजन हिताय । बहुजन सुखाय ।।

४२ वर्षापासून नियमितपणे प्रकाशित होणारे जनसामान्यांच्या प्रश्नांचा ध्यास असणारे एकमेव निर्भिड...

४३

माणदेश वार्ता

संस्थापक संपादक :
स्व.मारूती शिवाजी सोनवणे (एम.ए.)

स्थापना
६ नोव्हेंबर १९८३

RNI NO.
MAH/MAR/2004/16467

POSTAL REGD.
L2/RNP/PPR/04/2024-2026

FACEBOOK
MANDESH VARTA

सांगोला | जुने वर्ष ४३ वे नवीन वर्ष २३ वे | रविवार दि १६ ऑगस्ट २०२६ | पाने ४ | मूल्य १ ₹ | अंक ३४ वा

भांडणाचा वाद मिटवण्यासाठी गेलेल्या तरुणावर तलवारीसारख्या धारदार हत्याराने तसेच कुऱ्हाडीच्या लोखंडी दांड्याने मारहाण

सांगोला तालुक्यातील एखतपूर येथील घटना; काळ्या रंगाच्या क्रेटा कारचीही तोडफोड करून नुकसान केल्याचा आरोप

सांगोला : मागील भांडणाचा वाद मिटवण्यासाठी गेलेल्या तरुणावर तलवारीसारख्या धारदार हत्याराने तसेच कुऱ्हाडीच्या लोखंडी दांड्याने मारहाण केल्याची घटना एखतपूर (ता. सांगोला) येथे १५ ऑगस्ट रोजी सकाळी घडली. या प्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात आठ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या (इछड) विविध कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सुशांत कृष्णदेव पाटील (वय ३५, रा. चिनके, ता. सांगोला) यांनी याबाबत फिर्याद दिली आहे. पोलिसांनी सुरज पाटील, उदय पाटील, प्रताप पाटील, विजय बबन पाटील, शोभा पाटील, पुणम पाटील, चित्रा पाटील आणि काजल पाटील (सर्व रा. एखतपूर, ता. सांगोला) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १५ ऑगस्ट रोजी सकाळी सुमारे १० वाजता सुशांत पाटील हे एकतपूर येथील सुनिता पाटील यांच्या घरी मागील दिवशी झालेला वाद मिटवण्यासाठी गेले होते. यावेळी 'तुम्ही आमचे भांडण मिटवणारे कोण?' असे म्हणत आरोपींनी त्यांच्याशी वाद घातल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

यावेळी उदय पाटील याने स्टीलसारखे चमकणारे तलवारीसदृश हत्यार घेऊन सुशांत पाटील यांच्या डाव्या हाताच्या मनगटाजवळ तसेच पोटरीवर मारून जखमी केल्याचा आरोप आहे. पुन्हा मारहाण करण्याचा प्रयत्न सुरू असताना दत्ता पाटील मध्ये आल्याने त्याच्या उजव्या हाताला जखम झाल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

दरम्यान, सुरज पाटील याने अशोक पाटील यांच्या डोक्यात व पाठीवर तसेच विजय विठ्ठल पाटील यांच्या मानेवर त्याच प्रकारच्या हत्याराने मारहाण करून जखमी केल्याचे नमूद करण्यात आले आहे. प्रताप पाटील याने विजय बबन पाटील यांच्या हातातील कुऱ्हाडीच्या लोखंडी दांड्याने सुशांत पाटील यांच्या पायावर व पाठीवर मारहाण केली. तसेच अशोक पाटील यांच्या डोक्यातही कुऱ्हाडीच्या दांड्याने मारल्याचा आरोप आहे.

याशिवाय पुनम पाटील, चित्रा पाटील आणि काजल पाटील यांनी सुशांत पाटील यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करून शिवीगाळ केल्याचे फिर्यादीत नमूद आहे. तर शोभा बबन पाटील यांनी सुशांत यांच्या चुलत भावाला, भागवत मनोहर पाटील यांना गुडघ्यावर काठीने मारहाण केल्याचेही पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.

मारहाणीच्या घटनेदरम्यान संबंधित व्यक्तींनी काळ्या रंगाच्या क्रेटा कारचीही तोडफोड करून नुकसान केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात पोलिसांनी आठही संशयितांविरुद्ध इछड कलम ११८(१), ११५(२), ३५१(२)(३), ३५२, ३२४(४), १८९(२), १९१(२), १९१(३) आणि १९० अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

या प्रकरणी सांगोला पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक ७३४/२०२६ प्रमाणे नोंद करण्यात आली आहे. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोहेकॉ/१८१० वाघमोडे यांनी केली असून, पुढील तपास पोहेकॉ/१२१५ कोकरे करीत आहेत. घटनेतील मारहाण, वापरण्यात आलेली हत्यारे, जखमी व्यक्ती तसेच वाहनाच्या नुकसानीबाबत पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

सांगोल्यात चोरांची दबंगगिरी; फिल्मी स्टाईल लूट !

पिस्तूल लावून व्यावसायिकाला धमकावले; सात जणांनी लुटला २ लाख ८५ हजारांचा ऐवज

सांगोला : काळी स्कॉर्पिओ... सात जण... अचानक मारहाण... डोक्यावर पाईपने प्रहार आणि त्यानंतर पिस्तूलासारखे हत्यार लावून जीवे मारण्याची धमकी! असा एखाद्या चित्रपटातील थरारक प्रसंग वाटावा, असा चोरांची दबंगगिरीचा प्रकार सांगोल्यातील महूद रोड बायपास परिसरात घडला. ट्रान्सपोर्ट व्यावसायिकाला धमकावत व मारहाण करत त्याच्याकडील रोख रक्कम आणि सोन्याचे दागिने असा तब्बल २ लाख ८५ हजार रुपयांचा ऐवज जबरदस्तीने लुटण्यात आला.

दरम्यान नागरिकांनी पाठलाग करून संशयितांची स्कॉर्पिओ अडवली आणि एका संशयिताला पकडण्यात यश आले. सचिन तुळशीराम महांकाळ (वय ३४, व्यवसाय ट्रान्सपोर्ट, रा. वासुद, केदार मळा, ता.सांगोला) हे मंगळवारी (दि.११) रात्री सुमारे आठ वाजता महूद रोड बायपास येथील जिजाऊ पार्क परिसरात फिरण्यासाठी गेले होते. त्यावेळी काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी त्यांच्या जवळ येऊन थांबली.स्कॉर्पिओमधून सुमारे सात अनोळखी इसम खाली उतरले आणि त्यांनी महांकाळ यांना घेरून मारहाण करण्यास सुरुवात केली. अचानक झालेल्या हल्ल्यामुळे ते घाबरले. यातील एका इसमाने त्यांच्या डोक्याच्या मागील बाजूस पांढऱ्या रंगाच्या पाईपने जोरदार प्रहार केला. त्यामुळे त्यांच्या डोक्याला दुखापत होऊन वेदना होऊ लागल्या. त्याचवेळी आणखी एका इसमाने त्यांच्या डोक्याला

पिस्तुलासारखे हत्यार लावून जीवे मारण्याची भीती दाखवत शांत राहण्यास सांगितले. यानंतर इतर पाच जणांनीही महांकाळ यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यांच्या पॅन्टच्या खिशातील ४० हजार रुपये रोख जबरदस्तीने काढून घेतले. तसेच गळ्यातील अंदाजे अडीच तोळे वजनाची १ लाख ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची चैन आणि बोटातील अंदाजे एक तोळा वजनाची ७० हजार रुपये किमतीची सोन्याची अंगठी हिसकावून घेण्यात आली.

लूट केल्यानंतर सर्व संशयित काळ्या रंगाच्या स्कॉर्पिओमध्ये बसले आणि मंगळवेढा-सोलापूर रोडच्या दिशेने भरधाव वेगाने निघून गेले. घटनेनंतर महांकाळ यांनी मदतीसाठी आरडाओरड केली. आजूबाजूचे नागरिक घटनास्थळी धावून आले. मारहाणीत त्यांच्या डोक्याला व पाठीच्या भागाला दुखापत झाली.

दरम्यान नागरिकांनी संशयितांच्या स्कॉर्पिओचा पाठलाग केला. सांगोला शहरातील वासुद रोड, शिवाजीनगर परिसरात काळ्या रंगाची स्कॉर्पिओ गाडी व त्यातील एका इसमास पकडण्यात आले

मुक्त विचार

कुंभाच्या नावाखाली 'कुंभकर्णी' भ्रष्टाचार? त्र्यंबकेश्वरमधील ५००-६०० कोटींच्या कथित घोटाळ्याचा पर्दाफाश झाला असेल तर सत्य बाहेर आलेच पाहिजे!

कुंभमेळा म्हणजे केवळ धार्मिक सोहळा नाही, तर तो महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेचा, श्रद्धेचा आणि प्रशासनाच्या कार्यक्षमतेचा कस पाहणारा महाकाय उपक्रम आहे. लाखो भाविक त्र्यंबकेश्वरला येणार असताना रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य, वाहतूक, सुरक्षा आणि निवासाच्या सुविधा उभारण्यासाठी सरकार कोट्यवधी रुपये खर्च करीत आहे. अशा वेळी या निधीच्या प्रत्येक रुपयाचा हिशेब पारदर्शक असणे ही जनतेची रास्त अपेक्षा आहे. मात्र, कुंभमेळ्याच्या कामांच्या नावाखाली बनावट कार्यादेश तयार करून तब्बल ५०० ते ६०० कोटी रुपयांची फसवणूक करणारी साखळी असल्याचा आरोप कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी केला असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. ही रक्कम छोटी-मोठी नाही. पाचशे ते सहाशे कोटी म्हणजे केवळ आकडा नाही, तर तो जनतेच्या करातून जमा झालेला पैसा आहे. या पैशातून कित्येक गावांना पाणीपुरवठा योजना मिळू शकतात, शेकडो किलोमीटरचे रस्ते दुरुस्त होऊ शकतात, आरोग्य सुविधांना बळ मिळू शकते आणि ग्रामीण भागातील अनेक मूलभूत प्रश्न मार्गी लागू शकतात. त्यामुळे कुंभाच्या नावाखाली सार्वजनिक निधीचा गैरवापर झाला असल्याचा संशय जरी व्यक्त होत असेल, तरी त्याची मुळापासून चौकशी झालीच पाहिजे. नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरण हे महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेले विशेष शासकीय प्राधिकरण असून, सिंहस्थ कुंभमेळा २०२७ च्या नियोजन, समन्वय आणि देखरेखीची मुख्य जबाबदारी त्यांच्यावर आहे. पायाभूत सुविधा, स्वच्छता व कचरा व्यवस्थापन, सुरक्षा, वाहतूक, डिजिटल व्यवस्था आणि भाविकांच्या सुविधांसह विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय साधण्याचे काम या प्राधिकरणामार्फत केले जाते. स्थानिक स्वराज्य संस्था, राज्य व केंद्र शासनाचे विभाग तसेच इतर संबंधित घटकांच्या सहकार्याने लाखो भाविकांसाठी सुरक्षित आणि सुयोग्य व्यवस्था उभारणे हे त्याचे प्रमुख उद्दिष्ट आहे. त्यामुळे एवढ्या व्यापक जबाबदारीच्या प्राधिकरणाच्या अखत्यारीतील आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता ही पर्याय नसून अनिवार्यता आहे. नाशिक-त्र्यंबकेश्वर सिंहस्थासाठी मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधांची कामे हाती घेतली जात आहेत. त्यामुळे या संपूर्ण व्यवस्थेत 'कोणते काम कुणाला दिले? कोणत्या प्रक्रियेत दिले? किती खर्च मंजूर झाला? प्रत्यक्षात किती काम झाले?' याची माहिती जनतेसमोर असणे आवश्यक आहे.

विशेषतः 'बनावट कार्यादेश' हा शब्दच धक्कादायक आहे. जर कार्यादेश खरोखरच बनावट असतील, तर प्रश्न केवळ कंत्राटदारांपुरता मर्यादित राहत नाही. कार्यादेश तयार करणारे कोण? त्यांची पडताळणी कोणी केली? मंजुरीची प्रक्रिया कशी पार पडली? निधी वितरित झाला का? बिलांची तपासणी कोणी केली? प्रत्यक्ष काम न करता देयके काढण्याचा प्रयत्न झाला का? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे या संपूर्ण साखळीला राजकीय किंवा प्रशासकीय पाठबळ होते का? या प्रश्नांची उत्तरे मिळाल्याशिवाय प्रकरणावर पडदा पडता कामा नये. सरकारी कामांमध्ये भ्रष्टाचाराच्या आरोपांची चर्चा नवीन नाही. परंतु धार्मिक श्रद्धेशी संबंधित आणि देशभरातून भाविक येणाऱ्या कुंभमेळ्यासारख्या महत्त्वाच्या आयोजनात आर्थिक गैरव्यवहाराचे सावट पडणे अधिक गंभीर आहे. कुंभाच्या नावावर भ्रष्टाचार झाला तर तो केवळ सरकारी तिजोरीवरचा डल्ला नाही, तर तो भाविकांच्या श्रद्धेचा आणि समाजाच्या विश्वासाचा अपमान आहे.

मात्र, या प्रकरणात एक महत्त्वाची बाब स्पष्ट केली पाहिजे, आरोप म्हणजे दोषसिद्धी नव्हे. कोणत्याही व्यक्तीचे, अधिकाऱ्याचे किंवा संस्थेचे नाव केवळ संशयाच्या आधारावर दोषी ठरवणे योग्य नाही. त्यामुळे मंत्री महाजन यांनी केलेल्या आरोपांची निष्पक्ष, स्वतंत्र आणि दस्तऐवजाधारित चौकशी होणे आवश्यक आहे. दोषी आढळणारा कोणत्याही स्तरावरील अधिकारी, कर्मचारी, कंत्राटदार किंवा संबंधित व्यक्ती असो, त्याच्यावर कायद्यानुसार कठोर कारवाई झाली पाहिजे. यासाठी केवळ चौकशी समिती नेमून चालणार नाही. चौकशीचा अहवाल जनतेसमोर आला पाहिजे. कोणत्या कामासाठी किती निधी मंजूर झाला, किती कार्यादेश काढले गेले, निविदा प्रक्रिया कशी पार पडली, किती कामे प्रत्यक्ष पूर्ण झाली आणि किती रक्कम खर्च झाली, याचा कामनिहाय हिशेब सार्वजनिक केला पाहिजे. कुंभमेळ्यासाठी हजारो कोटी रुपयांच्या पायाभूत सुविधांची कामे प्रस्तावित आहेत. त्यामुळे एवढ्या मोठ्या आर्थिक व्यवहारात पारदर्शकता नसेल, तर गैरव्यवहाराला वाव मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणूनच 'कुंभ आला की निधी आला आणि निधी आला की टेंडरची घाई झाली' अशी मानसिकता प्रशासनात निर्माण होता कामा नये. कुंभमेळ्याची तारीख निश्चित असली तरी भ्रष्टाचाराला कोणतीही 'डेडलाइन' नसावी. वेळेचे कारण पुढे करून नियमांना बगल दिली गेली, तर त्यातूनच गैरव्यवहाराची दारे उघडतात. मंत्री महाजन यांनी हा प्रकार उघडकीस आणला असेल आणि संबंधितांवर कठोर कारवाईचे आदेश दिले असतील, तर पुढची जबाबदारी सरकारची आहे. 'गौप्यस्फोट' हा पहिला टप्पा आहे आणि सत्य उजेडात आणणे हा खरा कस आहे.सरकारने तातडीने या कथित आर्थिक गैरव्यवहाराची स्वतंत्र चौकशी करावी. बनावट कार्यादेशांची सत्यता तपासावी. संबंधित ई-टेंडर, प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मान्यता, अंदाजपत्रके, मोजमाप पुस्तिका, बिले आणि देयकांची सखोल तपासणी करावी. आवश्यक असल्यास आर्थिक गुन्हे तपास यंत्रणेमार्फतही चौकशी करावी. दोष सिद्ध झाल्यास केवळ निलंबन किंवा बदली करून प्रकरण संपवू नये; सरकारी निधीची वसुली आणि दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई झाली पाहिजे. कुंभमेळा हा महाराष्ट्राच्या प्रतिष्ठेचा विषय आहे. त्यामुळे या आयोजनावर भ्रष्टाचाराचा डाग लागता कामा नये. कुंभाच्या पवित्रतेची चर्चा करणाऱ्यांनी आधी सरकारी पैशाच्या पवित्रतेची काळजी घ्यावी. भाविकांच्या श्रद्धेचा सन्मान मंदिरातच नव्हे, तर प्रशासनाच्या प्रत्येक फाईलमध्ये, प्रत्येक कार्यादेशात आणि प्रत्येक रुपयाच्या खर्चात दिसला पाहिजे.

आज प्रश्न केवळ ५०० किंवा ६०० कोटींचा नाही. प्रश्न असा आहे की, सरकारी यंत्रणा जनतेच्या पैशाची रखवालदार आहे की कंत्राटदारांच्या हिताची मध्यस्थ? या प्रश्नाचे उत्तर केवळ निवेदनातून नव्हे, तर दस्तऐवज, चौकशी आणि पारदर्शक कारवाईतून मिळाले पाहिजे. कारण कुंभमेळा श्रद्धेचा आहे, पण सरकारी पैसा मात्र जनतेचा आहे आणि जनतेच्या पैशाचा हिशेब मागणे हा कोणताही अपराध नाही, तर तो लोकशाहीचा अधिकार आहे. कुंभाच्या नावाखाली भ्रष्टाचाराचा 'कुंभ' भरत असेल, तर तो फोडलाच पाहिजे!

-प्रवीण बागडे,नागपूर

विचारधन

अपयश तेव्हाच येते, जेव्हा आपण आपले आदर्श, उद्दिष्ट आणि सिद्धांत विसरून जातो.कदाचित जीवनात भीतीपेक्षा वाईट आणि खतरनाक काहीच नाही.

-पंडित जवाहरलाल नेहरू

सोशल मीडियाच्या जगात भविष्याचा मार्ग विसरलेली तरुणाई

आजचा काळ हा वेगवान तंत्रज्ञानाचा, इंटरनेटचा आणि सोशल मीडियाचा काळ आहे. मोबाईल, इंस्टाग्राम, फेसबुक, युट्यूब, रील्स आणि ऑनलाइन मनोरंजन यामध्ये आजची तरुण पिढी इतकी गुंतली आहे की अनेकांना आपल्या आयुष्याचे खरे ध्येय आणि भविष्यातील दिशा काय असावी याचाच विसर पडत चालला आहे.

पूर्वीच्या काळात तरुणांच्या चर्चेचे विषय शिक्षण, करिअर, व्यवसाय किंवा समाजकारण असायचे. आज मात्र अनेक तरुणांचे तासन्तास रील्स पाहण्यात, गेम खेळण्यात, पार्ट्या करण्यात किंवा सोशल मीडियावर स्वतःला सिद्ध करण्यात जात आहेत. मनोरंजन चुकीचे नाही, परंतु जेव्हा ते आपल्या भविष्यातील उद्दिष्टांपेक्षा मोठे बनते, तेव्हा ती चिंतेची बाब ठरते.

आज सोशल मीडियामुळे अनेक तरुणांना असे वाटते की प्रसिद्धी आणि पैसा सहज मिळवता येतो. एखादा इन्फ्लुएन्सर, युट्युबर किंवा सेलिब्रिटी पाहून त्यांचे यश दिसते, पण त्यामागील अनेक वर्षांची मेहनत, संघर्ष आणि शिस्त दिसत नाही.

परिणामी, काही तरुण मेहनतीपेक्षा शॉर्टकट शोधण्यात वेळ घालवतात. पण वास्तव हे आहे की कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी सातत्य, कौशल्य आणि कठोर परिश्रम यांना पर्याय नाही.

पालकांचे अनुभव का महत्त्वाचे आहेत?आज अनेक तरुणांना वाटते की पालक जुन्या विचारांचे आहेत आणि त्यांना आधुनिक जगाची माहिती नाही. पण हे अर्धसत्य आहे.

पालकांनी आपल्या आयुष्यात अनेक चढ-उतार पाहिलेले असतात. त्यांनी आर्थिक संघर्ष, नोकरीतील आव्हाने, व्यवसायातील जोखीम आणि जीवनातील वास्तव अनुभवलेले असते. त्यामुळे त्यांच्या सल्ल्यामध्ये अनुभवाचे शहाणपण असते.

प्रत्येक निर्णय पालकांनीच घ्यावा असे नाही, पण त्यांच्या मतांचा विचार करणे आवश्यक आहे. अनेक वेळा तरुण भावनेच्या भरात निर्णय घेतात, तर पालक दीर्घकालीन परिणामांचा विचार करतात.करिअर नियोजन जितके लवकर, तितके चांगले,दहावी किंवा बारावी झाल्यानंतरच करिअरचा विचार सुरू करणे ही मोठी चूक आहे. विद्यार्थ्यांनी आठवी-नववीपासूनच आपल्या आवडी, क्षमता आणि कौशल्ये ओळखण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

स्वतःला काही प्रश्न विचारणे गरजेचे आहे:मला कोणत्या विषयात आवड आहे?

माझी ताकद कोणती आहे?मला नोकरी करायची आहे की व्यवसाय?

पुढील १० वर्षांमध्ये मी स्वतःला कुठे पाहतो?माझे आर्थिक उद्दिष्ट काय आहे?

या प्रश्नांची उत्तरे शोधल्यास करिअरची दिशा अधिक स्पष्ट होते.

करिअर निवडताना लक्षात ठेवण्यासारख्या गोष्टी-

१. फक्त मित्रांच्या मागे जाऊ नका-

मित्र इंजिनिअरिंगला जात आहेत म्हणून आपणही जावे, किंवा एखादा कोर्स लोकप्रिय आहे म्हणून तो निवडावा, असे करू नका.

२. कौशल्यांना प्राधान्य द्या-

आजच्या जगात पदवीसोबत कौशल्येही महत्त्वाची आहेत. कम्युनिकेशन, संगणक ज्ञान, इंग्रजी, डिजिटल मार्केटिंग, प्रोग्रामिंग, डेटा ॲनालिटिक्स यांसारखी कौशल्ये भविष्यासाठी उपयुक्त ठरतात.

३. मार्गदर्शन घ्या-

शिक्षक, करिअर सल्लागार, उद्योगातील तज्ञ आणि अनुभवी व्यक्तींशी चर्चा करा.

४. वेळेचे व्यवस्थापन शिका-

दररोज ३-४ तास सोशल मीडियावर खर्च करण्याऐवजी त्यातील काही वेळ नवीन कौशल्य शिकण्यासाठी वापरा.

सोशल मीडिया – साधन की सापळा?

सोशल मीडिया पूर्णपणे वाईट नाही. योग्य वापर केल्यास ते ज्ञान, व्यवसाय, नेटवर्किंग आणि करिअरच्या संधी उपलब्ध करून देऊ शकते.

प्रश्न सोशल मीडियाचा नाही, तर त्याच्या वापराचा आहे.जर सोशल मीडिया तुमच्या ध्येयाला मदत करत असेल तर तो साधन आहे. पण जर तो तुमचा वेळ, एकाग्रता आणि भविष्य हिरावून घेत असेल तर तो सापळा आहे.आजची तरुण पिढी बुद्धिमान, तंत्रज्ञानस्नेही आणि अमर्याद क्षमता असलेली आहे. मात्र ही क्षमता योग्य दिशेने वापरणे आवश्यक आहे. पार्टी, मनोरंजन आणि सोशल मीडिया हे जीवनाचा भाग असू शकतात, पण तेच जीवनाचे ध्येय बनता कामा नये.आज घेतलेले निर्णयच उद्याचे भविष्य घडवतात. त्यामुळे तरुणांनी पालकांचे अनुभव ऐकावेत, योग्य मार्गदर्शन घ्यावे, स्पष्ट करिअर नियोजन करावे आणि स्वतःच्या स्वप्नांसाठी मेहनत करावी.कारण वेळ निघून गेल्यावर संधी परत येत नाहीत, पण योग्य वेळी केलेले नियोजन संपूर्ण आयुष्य बदलू शकते.तरुणाईची खरी ओळख मोबाईलच्या स्क्रीनमध्ये नाही, तर तिच्या स्वप्नांमध्ये, मेहनतीमध्ये आणि भविष्य घडवण्याच्या जिद्दीमध्ये असते.

माणदेश वार्ता हे साप्ताहिक मालक, प्रकाशक, संपादक सोनवणे रोहित मारूती यांनी मुद्रक माळी अशोक बाळकृष्ण यांच्या बाळकृष्ण ऑफसेट प्रिंटर्स,नेहरू चौक, कोर्टा जवळ, सांगोला, जि. सोलापूर येथे छापून १२७९ अ भारत गल्ली, सांगोला, जि.सोलापूर येथे प्रसिद्ध केले. E-Mail- mandesh_varta@rediffmail.com
संपादक : सोनवणे रोहित मारूती (या अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.) . जुने वर्ष-४३ वे अंक-४२ वा मो. ९४२०६६६५०१, ९०२८५९१४३१

सांगोला विद्यामंदिरमध्ये हर घर तिरंगा अभियानांतर्गत भव्य प्रभात फेरीचा उत्साह

सांगोला : भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने केंद्र शासनाच्या हर घर तिरंगा अभियानांतर्गत १४ ऑगस्ट २०२६ रोजी सांगोला तालुका शिक्षण प्रसारक मंडळ सांगोला संचलित सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजच्या वतीने शहरातून विद्यार्थ्यांची भव्य प्रभात फेरी काढण्यात आली.

देशभक्तीपर घोषणांनी आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने संपूर्ण सांगोला शहर दुमदुमून गेले. या फेरीत विद्यार्थ्यांनी भारत माता की जय,वंदे मातरम, आणि'हर घर तिरंगा अशा घोषणा देऊन नागरिकांमध्ये राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली.

प्रभात फेरीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये राष्ट्रध्वजाबद्दल जाणीव-जागृती करण्यात आली. विशेषतः भारतीय ध्वज संहितेचे काटेकोरपणे पालन व्हावे आणि अजाणतेपणी राष्ट्रध्वजाचा अपमान होऊ नये, याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात आले.

या भव्य प्रभात फेरीचे यशस्वी नियोजन सांगोला विद्यामंदिर प्रशाला व ज्युनिअर कॉलेजचे प्राचार्य चारूदत्त जगताप, उपमुख्याध्यापक प्रदीप धुकटे, उपप्राचार्य शिवशंकर तटाळे, पर्यवेक्षक काकासो नरूटे, शुभांगी घोंगडे यांचे मार्गदर्शनाखाली व एन.सी.सी.विभाग प्रमुख मकरंद अंकलगी, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.डी.के.पाटील, उत्सव विभाग प्रमुख प्रशाला नरेंद्र होनराव ज्युनिअर कॉलेज प्रा.धनाजी चव्हाण, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांच्या सहकार्याने करण्यात आले, यामध्ये विद्यार्थ्यांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

सांगोल्यात प्रशासनाच्यावतीने भव्य तिरंगा मोटारसायकल रॅली

सांगोला : 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत सांगोला शहरात तहसील कार्यालयाच्या वतीने शुक्रवारी (ता. १४) भव्य तिरंगा मोटारसायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. सकाळी १० वाजता तहसील कार्यालयापासून रॅलीला सुरुवात झाली. हातात तिरंगा घेऊन आणि देशभक्तीपर वातावरणात निघालेल्या या रॅलीने शहरवासीयांचे लक्ष वेधून घेतले. या रॅलीमध्ये सांगोला तालुक्याचे आमदार बाबासाहेब देशमुख, तहसीलदार भगवत मॅडम, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी डॉ. सुधीर गवळी, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे यांच्यासह नगराध्यक्ष, सर्व नगरसेवक तसेच तालुक्यातील विविध प्रशासकीय विभागांचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले. तहसील कार्यालयापासून सुरू झालेल्या या तिरंगा मोटारसायकल रॅलीत सहभागी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या मोटारसायकलींवर तिरंगा ध्वज लावून देशभक्तीचा संदेश दिला. रॅलीदरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणांनी शहरातील वातावरण देशभक्तिमय झाले. 'हर घर तिरंगा' अभियानाच्या माध्यमातून प्रत्येक नागरिकाने स्वातंत्र्यदिनाचा उत्सव उत्साहाने साजरा करावा आणि आपल्या घरावर तिरंगा फडकवावा, असा संदेश या रॅलीतून देण्यात आला. विविध शासकीय विभागांनी एकत्रित सहभाग नोंदवत अभियानाला व्यापक स्वरूप दिले.या रॅलीच्या आयोजनामुळे सांगोला शहरात स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभक्तीचे वातावरण निर्माण झाले. प्रशासकीय अधिकारी, लोकप्रतिनिधी व कर्मचाऱ्यांनी एकत्र येत 'हर घर तिरंगा' अभियानात सहभाग घेतल्याने रॅलीला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

सह्याद्री फार्मसी मध्ये डी.फार्मसी, बी.फार्मसी प्रथम वर्ष ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस मुदतवाढ

सांगोला : सह्याद्री कॉलेज ऑफ फार्मसी,मेथवडे येथे शैक्षणिक वर्ष २०२६ -२७ करिता बारावी शास्त्र उत्तीर्ण विद्यार्थ्यांकरिता मोफत डी.फार्मसी, बी.फार्मसी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया सुरु असून त्यास शासनाने अनुक्रमे दि.३१/०८/२६ व १४/०८/२०२६ पर्यंत मुदतवाढ दिली असल्याची माहिती संस्थेच्या अध्यक्षा अनिता दिलीपकुमार इंगवले व संस्था विश्वस्त श्री. विश्वजीत दिलीपकुमार इंगवले यांनी दिली. सुधारित वेळापत्रकानुसार आता बारावी शास्त्र उत्तीर्ण विद्यार्थी दिनांक १४/०८/२०२६ पर्यंत बी.फार्मसी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस आपले रजिस्ट्रेशन करू शकतात व अर्ज निश्चिती १६ /०८/२६ पर्यंत करू शकतात तसेच डी.फार्मसी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस रजिस्ट्रेशन व अर्ज निश्चिती ३१/०८/२६ पर्यंत करू शकतात.

तरी सर्व विद्यार्थी व पालकांनी या मुदतवाढीचा लाभ घ्यावा, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांनी केले आहे.अधिक माहितीसाठी डॉ.ए. एम.तांबोळी (९९७५४०२४६५), डॉ.एन.ए.तांबोळी (९४२२६४४८७६), श्री.प्रकाश पाटील (९८८१४३३६५८), श्री.पी.एस.लोखंडे (९८२३१०७३७१) याना संपर्क करावा.

हर घर तिरंगा अभियानांतर्गत सांगोला महाविद्यालयात तिरंगा रॅली

सांगोला : सांगोला तालुका उच्च शिक्षण मंडळाचे सांगोला महाविद्यालय, सांगोला येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या संयुक्त विद्यमाने 'हर घर तिरंगा' अभियानांतर्गत तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयासमोरील शिक्षक कॉलनी तसेच परिसरातून काढण्यात आलेल्या या रॅलीमध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे स्वयंसेवक, राष्ट्रीय छात्र सेना विभागाचे स्वयंसेवक तसेच महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच प्राध्यापक मोठ्या संख्येने सहभागी झाले.

दरम्यान, राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने 'वंदे मातरम' या राष्ट्रगीतास १५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने महाविद्यालयाच्या परिसरात आकर्षक रांगोळी साकारण्यात आली. रांगोळीच्या माध्यमातून 'वंदे मातरम' गीताच्या ऐतिहासिक आणि राष्ट्रभावनेशी असलेल्या नात्याचे दर्शन घडविण्यात आले. या उपक्रमालाही विद्यार्थी व शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. रॅलीदरम्यान विद्यार्थ्यांनी हातात तिरंगा ध्वज घेऊन देशभक्तीपर घोषणा देत परिसरात राष्ट्रप्रेमाची भावना जागृत केली. 'हर घर तिरंगा', 'भारत माता की जय', 'वंदे मातरम' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे रॅलीला विशेष उत्साहाचे आणि देशभक्तीपूर्ण वातावरण प्राप्त झाले.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. राम पवार, डॉ. विद्या जाधव, डॉ. बी. जी. पवार, डॉ. जे. एम. तांबोळी, डॉ. एम. डी. वेदपाठक, डॉ. एस. एस. भुंजे, प्रा. शंकर पाटील, डॉ. तानाजी यादव, प्रा. नितीन सुरवसे, कार्यालयीन अधीक्षक श्री. विलास माने यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. सदर उपक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे कार्यक्रमाधिकारी डॉ. सदाशिव देवकर, डॉ. रेणुकाचार्य खानापुरे, प्रा. स्वप्निल शहा तसेच राष्ट्रीय छात्र सेना प्रमुख कॅप्टन संतोष कांबळे यांनी केले.

निर्भिड व सडेतोड बातम्यांसाठी
नियमित वाचा....
साप्ताहिक माणदेश वार्ता

ज्या मार्गांवर बसगाड्यांची कमतरता आहे, त्या मार्गांचा विचार करून आवश्यक त्या ठिकाणी बससेवा वाढविण्यासाठी पाठपुरावा करणार : आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख

सांगोला बस स्थानकाच्या ताफ्यात पाच नवीन बसगाडया दाखल

सांगोला : सांगोला बस स्थानकाच्या ताफ्यात पाच नवीन बसगाड्यांची भर पडली असून, या बसगाड्यांचे पूजन आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यार्थी प्रवासी व नागरिकांच्या शुभहस्ते करण्यात आले. नवीन बसगाड्यांमुळे सांगोला शहरासह ग्रामीण भागातील प्रवाशांना अधिक चांगली, सुरक्षित व नियमित बससेवा मिळण्यास मदत होणार आहे.

. सांगोला तालुक्यातील प्रवाशांची वाढती संख्या, ग्रामीण भागातील अपुरी बससेवा तसेच विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय लक्षात घेऊन नवीन बसगाड्या उपलब्ध करून देण्याची मागणी आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी राज्य सरकारकडे केली होती.यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. त्यांच्या प्रयत्नांना यश मिळून सांगोला बस स्थानकाच्या ताफ्यात पाच नवीन बसगाड्या दाखल झाल्या आहेत.

यावेळी बोलताना आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख म्हणाले की, सांगोला तालुक्यातील विद्यार्थ्यांसह सर्वसामान्य नागरिकांसाठी एस.टी. बससेवा अत्यंत महत्त्वाची आहे. ग्रामीण भागातील अनेक विद्यार्थी शिक्षणासाठी दररोज सांगोला शहरात ये-जा करतात. त्यामुळे त्यांच्या वेळेवर आणि सुरक्षित प्रवासासाठी पुरेशा बसगाड्या उपलब्ध असणे गरजेचे आहे. नवीन पाच बसगाड्यांमुळे प्रवाशांना निश्चितच दिलासा मिळणार आहे. तालुक्यातील ज्या मार्गांवर बसगाड्यांची कमतरता आहे, त्या मार्गांचा विचार करून आवश्यक त्या ठिकाणी बससेवा वाढविण्यासाठी आपण पाठपुरावा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये, तसेच कामानिमित्त शहरात येणाऱ्या ग्रामीण भागातील नागरिकांना वेळेवर प्रवासाची सुविधा मिळावी, यासाठी एस.टी. महामंडळाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. प्रवाशांना चांगली सेवा आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांच्या पाठपुराव्यामुळे पुन्हा एकदा सांगोला बस स्थानकास पाच नवीन गाड्या देताना बसगाड्यांची नियमित देखभाल, वेळापत्रकाचे पालन आणि प्रवाशांशी सौजन्यपूर्ण वागणूक यालाही प्राधान्य देणे आवश्यक असल्याचे आमदार डॉ. देशमुख यांनी सांगितले.

सांगोला तालुक्यातील विद्यार्थी, महिला, शेतकरी, नोकरदार आणि सर्वसामान्य नागरिक मोठ्या प्रमाणात एस.टी. बससेवेवर अवलंबून आहेत. त्यामुळे बसगाड्यांची संख्या वाढविण्याची गरज आमदार डॉ. देशमुख यांनी राज्य सरकारच्या निदर्शनास आणून दिली होती. नवीन बसगाड्यांसाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले असून पाच नवीन बसगाड्या सांगोला बस स्थानकाच्या ताफ्यात दाखल झाल्या आहेत. नवीन बसगाड्यांमुळे तालुक्यातील विविध मार्गांवरील प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार असून विद्यार्थ्यांची होणारी गैरसोय कमी होण्यास मदत होणार आहे. यापुढेही आवश्यक त्या मार्गांवर बससेवा वाढविण्यासाठी राज्य सरकारकडे पाठपुरावा सुरूच ठेवणार असल्याचे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

यावेळी आगर व्यवस्थापक अंकुशराव सलगर, स्थानक प्रमुख पंकज तोंडे, वाहतूक निरीक्षक योगेश गवळी, नगरसेवक इंजिनिअर रमेश जाधव, विजय राऊत, रमेश अनुसे यांच्यासह पालक, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवाशांची गैरसोय दूर करणे हेच प्राधान्य सांगोला तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थी व सर्वसामान्य नागरिकांना वेळेवर आणि सुरक्षित बससेवा मिळावी, यासाठी नवीन बसगाड्यांची मागणी राज्य सरकारकडे केली होती. त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्याला यश मिळून पाच नवीन बसगाड्या सांगोल्याला उपलब्ध झाल्या आहेत. यापुढेही ज्या मार्गांवर बससेवेची आवश्यकता आहे, त्या ठिकाणी बसगाड्या उपलब्ध करून देण्यासाठी पाठपुरावा सुरूच ठेवणार आहे. असे आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी सांगितले.

सांगोल्याचा सुपुत्र प्रथमच सांगोला शहरात रेल्वे स्टेशन मास्टर; स्टेशन ग्रुप मधील माजी शिक्षकांच्या हस्ते सत्कार

सांगोला : सांगोला शहराच्या इतिहासात प्रथमच एक अत्यंत दुर्मिळ आणि ऐतिहासिक प्रसंग पाहायला मिळाला आहे. सांगोल्याचे सुपुत्र आणि सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे माजी विद्यार्थी असणारे श्री. अविनाश शिवदास घोंगडे यांची सांगोला रेल्वे स्टेशनचे 'स्टेशन मास्टर' म्हणून नियुक्ती झाली आहे. श्री. अविनाश घोंगडे हे यापूर्वी 'जत रोड' रेल्वे स्थानकावर स्टेशन मास्टर म्हणून कार्यरत होते.

नुकतीच त्यांची जत रोडवरून सांगोला रेल्वे स्थानकावर बदली झाली आहे. स्वतःच्या जन्मभूमीत आणि शहरात रेल्वे प्रशासनाची ही महत्त्वाची जबाबदारी सांभाळण्याची संधी मिळणे हा एक दुर्मिळ योग मानला जात आहे. या ऐतिहासिक क्षणाचे औचित्य साधून सांगोला रेल्वे स्थानकावर त्यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

विशेष म्हणजे, सत्कार करणाऱ्या 'स्टेशन ग्रुप'च्या सदस्यांमध्ये सांगोला विद्यामंदिर प्रशालेचे अनेक सेवानिवृत्त शिक्षक उपस्थित होते. यावेळी सेवानिवृत्त प्राचार्य नारायण विसापूरे, संजीव नाकील, भीमाशंकर पैलवान, सुभाष महिमकर, शंकर डोंबे, महादेव बोराळकर, बाळासाहेब कळमणकर, बाळासाहेब वाघमारे, अब्दुलगणी सय्यद, अमर गुळमिरे, भाऊसाहेब पवार, राजेंद्र झिरपे, इंजिनिअर अनिल घोंगडे यांच्यासह 'रेल्वे स्टेशन ग्रुप'चे सदस्य, रेल्वे कर्मचारी आणि सांगोला

शहरातील मित्र मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हुतात्मा भवनासाठी ५० लाखांचा निधी देणार; बलवडी येथे हुतात्मा महादेव शिंदे स्मारकाचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते अनावरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांची घोषणा

सांगोला : बलवडी (ता. सांगोला) येथे हुतात्मा महादेव शिंदे यांच्या स्मारकाचे अनावरण पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. यावेळी बलवडी गावात हुतात्मा भवन उभारण्यासाठी ५० लाख रुपयांचा निधी देण्याची घोषणा पालकमंत्री गोरे यांनी केली. यावेळी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, ५९ वर्षांनंतरही बलवडी ग्रामस्थांच्या मनात वीर सुपुत्र हुतात्मा महादेव शिंदे आणि वीरमाता पद्मिनी आई शिंदे यांच्याबद्दल असलेले प्रेम व आपुलकी कौतुकास्पद आहे. त्यांच्या स्मारकाचे अनावरण करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे.

हुतात्मा महादेव शिंदे यांना प्रथम अभिवादन करून हुतात्मा भवनासाठी ५० लाख रुपयांचा निधी देत असल्याची घोषणा करतो. देशाच्या रक्षणासाठी ऊन, वारा आणि पावसाची पर्वा न करता सेवा करणारा सैनिक हा देशाचा महत्त्वाचा घटक आहे. सैनिकाची सेवा संपली तरी देशप्रेम संपत नाही. शिंदे कुटुंबाचे देशासाठी असलेले योगदान मोठे असून वीरमाता पद्मिनी आई शिंदे यांनी कुटुंबाला दिलेली ताकद आणि त्यागही तितकाच महत्त्वाचा आहे, असेही त्यांनी सांगितले. मान नदीत पाणी सोडण्यासाठी प्रयत्न करण्यात आले असून आता विजेचा प्रश्न आणि पोलीस स्टेशनचा प्रश्नही मार्गी लावण्यासाठी प्रयत्न करू, अशी ग्वाही त्यांनी दिली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आमदार दीपक आबा साळुंखे पाटील होते, तर आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आमदार डॉ. बाबासाहेब देशमुख यांनी हुतात्मा स्मारकाचे अनावरण झाल्यामुळे सांगोला तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेल्याचे सांगितले. प्राचार्य संभाजी शिंदे यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी वीरमाता पद्मिनी आई शिंदे तसेच सुभेदार राजेंद्र धायगुडे यांच्या योगदानाबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला. माजी सरपंच विजयदादा शिंदे यांनी शिंदे कुटुंबाला गावातील सर्व नागरिकांनी सहकार्य करून समाधीस्थळ उभारल्याबद्दल ग्रामस्थांचे आभार मानले.

यावेळी तहसीलदार बाळूताई भागवत, गटविकास अधिकारी योगेश कांबळे, पोलीस निरीक्षक राहुल देशपांडे, बाळासाहेब एरंडे, शिक्षण सभापती चेतनसिंह केदार, सभापती पूनमताई इंगोले, जि.प. सदस्य शोभाताई खटकाळे, मारुती आबा बनकर, संभाजी आलदर यांच्यासह विविध मान्यवर, ग्रामपंचायत सदस्य, सोसायटी संचालक, माजी सैनिक, ग्रामस्थ, महिला उपस्थित होते.सूत्रसंचालन शिक्षक तात्यासो शिंदे यांनी केले, तर आभार माजी सरपंच बाळासाहेब शिंदे यांनी मानले.

हुतात्मा महादेव शिंदे आणि ह.भ.प. स्व. शारदाताई साळुंखे पाटील यांचे बहीण-भावाचे नाते होते, त्यामुळे शिंदे आणि साळुंखे कुटुंबांचे ऋणानुबंध यापुढेही कायम राहतील, असे आमदार दीपक आबा साळुंखे पाटील यांनी सांगितले.

अक्कलकोट नगरपरिषद, अक्कलकोट

श्री छत्रपती शॉपिंग सेंटरजवळ,ए- वन चौक, अक्कलकोट जि. सोलापूर
Email :comcakkalkot123@gmail.com

जा. क्र. २०२६/अ. न. प./आर आर ४७२ — दि. १२/०८/२०२६

जाहीर सूचना

मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम २०२६

अक्कलकोट शहरातील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की मा. भारत निवडणूक आयोग यांचेकडील दि. १४ मे २०२६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्रामध्ये मतदार याद्याचा विशेष सखोल पुनरिक्षण (डखठ) कार्यक्रम घोषित केला असून, दिनांक २०/०६/२०२६ पासून सदरचा कार्यक्रम शहरामध्ये राबविण्यात येत आहे. त्यानुषंगाने मतदार केंद्रनिहाय मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेमार्फत मतदारांचे गणना पत्रक भरून घेवून Digitization करण्याचे काम सुरु आहे. यामध्ये स्थलांतरीत, मयत, आढळ न झालेले, दुबार व वाटप न झालेले गणना पत्रकातील मतदार यांची पडताळणी करून त्यांची नावे मतदार यादीतून वगळण्याचे काम सुरु आहे.

या प्रक्रियेविषयीच्या तसेच मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांनी चिन्हांकित केलेल्या स्थलांतरीत, मयत, आढळ न झालेले, दुबार व वाटप न झालेले गणना पत्रकातील मतदारांची यांची दि. ०१/०८/२०२६ रोजी विशेष प्रभागसभेमध्ये वाचन करून प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. सदरची यादी नागरिकांना पाहण्याकरिता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व नगरपरिषद कार्यालयामध्ये उपलब्ध आहे. स्थलांतरीत, मयत, आढळ न झालेले, दुबार व वाटप न झालेले म्हणून चिन्हांकित करण्यात आलेल्या मतदारांच्या नावाचा समावेश प्रारूप मतदार यादीमध्ये होणार नसल्याने सदर यादीविषयी हरकती किंवा मतदारांविषयी माहिती मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांचेकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सही/-
(रमाकांत डाके)
सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी
अक्कलकोट नगरपरिषद अक्कलकोट